# तोरण

अंक ८७-९० एप्रिल २०११ ते मार्च २०१२

## अनुक्रमणिका

संपादकीय

मातंग, कैकाडी, वैदू व वडार - काल आणि आज

महिला ग्रामसभा

ग्रामपंचायत व ग्रामसभा यासंबंधी काही अुपयुक्त माहिती

कोकणातली गावकी पध्दत

घडामोडी

## संपादकीय

आज जग झपाट्याने बदलत आहे. सगळीकडे प्रगतीचे व विकासाचे वारे वाहत असल्याचे दिसून येते. भारतातसुध्दा जलदगतीने विकासाची वाटचाल सुरू असल्याचे जाणवत आहे. ह्या विकासाच्या दृश्य खुणा म्हणजे मोठे पक्के बांधलेले रस्ते, संबध शहरात इकडून तिकडे जोडणारे उड्डाणपुल, विमानतळ, अधुनिक व सर्व सोयींनी सुसज्ज अशा वातानुकूलीत इमारती, हॉटेल, रेस्टॉरंट व सिनेमागृहे, इत्यादी. हे सर्व पाहता आपण आपले धुळीचे जग मागे टाकून खूप पुढे आलोत असे वाटते.

परंतु विकास साधण्याच्या आत्यंतिक इच्छेमुळे आपण आपल्या विकास प्रक्रियेत सर्व समाजाला सामावून घेअू शकलो आहोत का? खेडोपाडी

देणगी मूल्य : रु. ५/-

टिव्ही व मोबाईल फोन पोहोचले आहेत हे खरे पण तिथे चांगले रस्ते, स्वच्छ पिण्याचे पाणी अशासारख्या मूलभूत सुविधा कुठे पोहोचल्या आहेत? याअुपर, औद्योगिक उत्पादनांमुळे, कारखान्यात तयार झालेल्या वस्तूंमुळे, जे समाज आपल्या पारंपारिक व्यवसायावर व कारागिरीवर अुदरनिर्वाह करत होते त्यांचे जगण्याचे साधनच नाहीसे व्हायला लागले आहे. मोठ्या प्रमाणावर होण्याऱ्या यांत्रिक अुत्पादनापुढे ते कुठे व कसे पुरे पडणार? साहजिकच अुदरनिर्वाहाची नवी साधने शोधणे त्यांना भाग पडले आहे व ते नवीन काम शोधण्याकरिता शहरांकडे पाहत आहेत. जर त्यांना शिक्षणाची संधी अुपलब्ध झाली असती तर कदाचित त्यांना योग्य पर्यायी व्यवसाय सापडले असते. अनेकवेळा असे न घडल्यामुळे त्यांना स्थलांतर करणारे कामगार हाच पर्याय राहतो. आज हीच परिस्थिती मांग, वैदू, कैकाडी, वडार अशा समाजांवर आली आहे.

याशिवाय, कारखान्यात तयार झालेली सिंथेटीक अुत्पादने जैविक विविधतेलाही धोका निर्माण करतात. एक अुदाहरण द्यायचे झाले तर आजकाल नायलॉनची ब्लँकेट्स बाजारात मिळतात.त्यांनी पारंपरिक घोंगडीची जागा घेतली आहे. घोंगडीला मागणीच नसल्यामुळे आता धनगरांना काळी लोकर देणाऱ्या मेंढ्या ठेवाव्यात असे आवर्जून वाटत नाही. हीच गोष्ट घायपातापासून व आंबाडीपासून तयार होणाऱ्या दोरांची व वाखाची. ह्यांची जागा आता नायलॉनच्या दोरीने घेतली आहे. साहजिकच जे समाज ह्या वस्तू तयार करत असत त्यांची मुले आपल्या वाडवडिलांची पारंपीरक कला व कौशल्य विसरून गेली आहेत. काही वर्षांनी कदाचित् घायपात व आंबाडी यांची लागवडच व्हायची नाही. कोण जाणे? ह्या समाजाच्या मुलांना चांगल्या नोकऱ्या मिळोत एवढीच आशा आपण करू शकतो.

आणखी एक अुदाहरण म्हणजे आजकाल लोक कोंबड्यांकरता तारेच्या जाळीची खुराडे वापरतात. कालपरवापर्यंत कैकाडी समाजाचे लोक कोंबड्यांकरता बांबूच्या टोपल्या बनवत असत. आता टोपल्यांची मागणी कमी झाली आहे. त्यामुळे त्यांच्या पारंपरिक व्यवसायावरही त्याचा परिणाम झाला आहे. जर आजूबाजूला कारखाने किंवा काही अुद्योगधंदा असेल तर त्या कंपन्यांमध्ये ह्यांची मुले कामधंदा शोधतात. कैकाडी समाजाचे आणखी एक वैशिष्ट म्हणजे हा समाज वर्षानुवर्षे गाढवे पाळत आला आहे. पण हेही आता खूप कमी झाले आहे. गाढवे पाळणे हे रोजच्या जीवनात फायद्याचे होणार नसेल तर तेही बंद होईल. पुढेमागे आपल्याला गाढवे फोटोतच पाहायची वेळ येईल कदाचित्.

विकासाचे आणि सतत होण्याऱ्या बदलाचे वारे फार झपाट्याने वाहत आहेत. थोडक्या वेळात एवढ्या जलदगतीने बदल घडून येताहेत की अधुनिकतेकडे झुकण्याच्या आपल्या हव्यासामुळे आपण पारंपरिक ज्ञानाच्या व जैविक विविधतेच्या स्वरूपात असलेला आपला मौल्यवान ठेवा कधीकधी हरवून जाण्याचा धोका अुद्भवतो. ह्या पार्श्वभूमीवर असे वाटते की आपण क्षणभर थांबून परिस्थितीचा आढावा घेअून मगच पुढचे पाअुल अुचलणे योग्य होईल.

**डॉ. नित्या घोटगे**
संचालिका, अंतरा, पुणे

# मातंग, कैकाडी, वैदू व वडार - काल आणि आज

आपल्या गावगाड्यामध्ये प्रत्येक बलुतेदार समाजाचे एक विशिष्ट स्थान आहे. विकासाच्या नावाखाली आजकालच्या बदललेल्या परिस्थितीमुळे त्यांचे पारंपरिक व्यवसाय चालू ठेवणे त्यांना अवघड होत चालले आहे. काही बलुतेदार समाजांचे पारंपरिक व्यवसाय व त्यांची आजची स्थिती ह्याबद्दलचे माझे निरिक्षण मी खाली देत आहे.

## मातंग समाज

घायपातापासून वाख तयार करुन दोरखंड बनवणे. सिंधीच्या झाडाच्या पानापासून केरसुणी तयार करणे व केळीच्या बुंध्याच्या वरचे फडे (आवरण) काढून त्याची दोरी बनवून त्यामध्ये आंब्याची पाने गुंफून तोरण तयार करणे हे या समाजाचे मुख्य व्यवसाय.

### वाखाचा उपयोग

बैलासाठी कासरा, आसूड, मुस्के, गळ्यासाठी, औताला, गाडीला जुंपण्यासाठी पट्टा, नांगरणी, पेरणी, फणपाणी व इतर शेती कामासाठी झोडणी याकरता होत असे. पूर्वी खेडेगावात विहीरीवर शेतीसाठी विद्युत पंप किंवा ऑईल इंजिन नव्हते. त्यावेळी मोटांचा वापर करुन शेतीला पाणी दिले जात होते. बैलगाडीसाठी सोल तसेच लहान जनावरे उदा. गाय, वासरु, रेडकू यासाठी काणी, मोठ्या जनावरासाठी येसन, घोड्याला बांधण्यासाठी भेंडुळे, घोड्यावर बि-हाड लादण्यासाठी जाळे, मेंढ्यांना रात्री शेतात बसविण्यासाठी वाघरी, शेळ्यांसाठी दावण, शेतात पिकांची पाखरापासून राखण करण्यासाठी पूर्वी शेतकरी गोफणीचा वापर करत ती गोफण या वाखापासून बनविली जात होती. तसेच भाकरीचे टोपले किंवा दही, दुध ठेवण्यासाठी शिंके, बाजेसाठी सुंब (दोरी) अशा विविध प्रकारच्या वस्तु या वाखापासून बनविल्या जात असत. या व्यवसायापासून मातंग कुटूंबाची उपजीविका बऱ्यापैकी व्हायची. त्यांना दुसऱ्याच्या शेतात मजुरी करण्याची गरज पडत नसे. धनगराला दिलेल्या मालाच्या मोबदल्यात धनगर समाजाकडून तांदूळ व पैसे मिळत असत. या व्यतिरिक्त केरसूण्यांचा उपयोग घर व ओटा झाडण्यासाठी असल्यामुळे, दिवाळीत लक्ष्मीपुजनाचे वेळी व घरात वास्तूशांतीचे वेळी केरसुणीचे पूजन होत असल्यामुळे केरसुण्यांना मागणी असायची. काही गावामध्ये कुटुंबामध्ये विवाह कार्य असेल तर वर्षभर पुरतील एवढ्या नवीन केरसुण्या खरेदी करुन ठेवण्याची प्रथा आहे. कारण नंतर वर्षभर दुसरी केरसुणी खरेदी करत नसत. सर्वसाधारण हा व्यवहार त्यांच्या गावात किंवा बाजारातच होत असे व त्याचे पैसे मिळत असत. केळीच्या बांबूचे, आंब्याच्या पानाचे तोरण घराच्या वास्तूशांतीकरता आवश्यक असे. तोरण बांधल्याशिवाय ब्राह्मण नवीन वास्तूची पूजा करत नसे. तोरणाची पूजा करुन मातंग समाजाच्या माणसाला दक्षिणा म्हणून पैसे देऊन वर पोषाखही देत असत. याशिवाय बैलपोळा असेल त्याच्या अगोदरच्या दिवशी ज्यांच्या घरी हा सण साजरा करणार

असतील त्यांच्याकडे जाऊन मातंग समाजातील व्यक्तीने मुळ (गवताचा प्रकार) द्यायचे असते. या दिवसाला खांदमळणी (बैलाची ) असे म्हणतात. मुळ दिल्यावर शेतकरी बैलांची पुजा करत असत. त्याबद्दल बैलमालक मातंग समाजातील व्यक्तीला धान्य व थोड्या प्रमाणात पैसे देत असत. तसेच दुस–या दिवशी म्हणजे सणाच्या दिवशी सकाळी असे तोरण गावातील सर्व घरांना बांधले जात असे व त्याच्या बदल्यात मातंग समाजातील व्यक्तीला हरभ–याची डाळ, गुळ, गोडेतेल, मीठ या वस्तू मिळत असत. आजची परिस्थिती पाहिली तर वाख बनवण्याचा व्यवसाय साधारण गेल्या १५ वर्षापासून बंद झाला आहे. कारण मार्केटमध्ये कपड्यांचे सूत, तंगुस (नायलॉन दोरी) आले. तसेच ट्रॅक्टरमुळे व सुधारित शेती अवजारे यामुळे बैलजोडीचा शेतात वापर कमी झाला व त्यामुळे बैलांची संख्या कमी झाली. धनगर समाजाने मेंढी व्यवसाय कमी करुन ट्रॅक्टर खरेदी केले, शेती करु लागले. आजकाल मातंग समाजाची लोक ऊसतोड करतात. काही लोक शेतात किरकोळ मजुरी, गवंडीकाम करतात. काही लोक मेंढ्या, शेळ्या पाळतात. काही लोक बाहेरगावी, शहरात, कंपनीमध्ये किरकोळ कामे करतात. म्युझिक बँन्ड मध्ये काम करतात. तसेच थोड्या प्रमाणात सरकारी नोकरी करतात.

## कैकाडी समाज

कावळीचे फोक,पिचोंडी (निळुंबी) यापासून कोंबड्यांची खुराडी बनविणे, नवीन झाडांसाठी आळी (कुंपन) बनविणे हे या समाजाचे पारंपरिक व्यवसाय आहेत. ह्याचबरोबर या समाजातील लोक गाढवंही पाळत असत. सध्याची परिस्थिती अशी आहे की सध्या हा समाज गाढव पाळत नाही. तसेच आता कोंबड्यांसाठी खुराडे व झाडांना लावायची आळी लोखंडाची वापरण्याची रीत आली. त्यामुळे कावळीच्या फोकांचा व निळुंबीच्या फोकांचा वापर कमी झाला आहे. त्यामुळे उपजीविकेसाठी या समाजाची मुले आता कंपनीमध्ये कामे करत आहेत. या समाजाची लोकसंख्या कमी आहे.

## वैदू समाज

या समाजातले पुरुष पूर्वी पत्र्यापासून घरगुती सामान ठेवण्यासाठी डबे, पत्र्याच्या धान्य निवडण्याच्या चाळण्या बनवत असत. तसेच वनस्पती औषधे उदा. वात, मुळव्याध, दमा, मुका मार लागून जर त्या ठिकाणी रक्त काळे पडले असल्यास त्या ठिकाणी जळवा (एक प्रकारचे कीडे) लावून ते रक्त काढून घेत. जळवामुळे वेदना कमी होत असत. अशा प्रकारचे उपचार करणे हाही त्यांचा पारंपरिक व्यवसाय असायचा.

या समाजाच्या महिला काळ्या मण्यांच्या पोती (महिलांसाठी), सुया, बीब्बे, कंगवा, आरसा, पीठाची चाळण, लहान मुलांसाठी हातातील विविध बांगड्या, दृष्टेचे मणी विकत असत. तसेच लहान मुलांचे पोटात सूज येणे यासारख्या किरकोळ आजारावरची झाडपाल्यांची औषधे या महिला खेडेगावात देत असत. आज परिस्थिती बदलली आहे. पुरुष माणसांनी हा व्यवसाय बंद केला आहे. कारण प्लास्टीक व स्टील मार्केटमध्ये आल्यामुळे या प्रकारचे डबे वापरण्याचे बंद झाले. पारंपरिक औषधाचे महत्व व वापर सध्या कमी होत आहे. शिवाय

मेडिकल, मोठे मोठे दवाखाने निघाले. त्यामुळे लोकांचा जास्त कल दवाखाना व मेडिकल याकडे आहे. तसेच सध्या या समाजाच्या काही लोकांनी संकरीत गाय पाळणे व विण्याच्या वेळेला विकून टाकणे, वाहन व्यवसाय, भंगार गोळा करणे, बाजार, यात्रा, जत्रा यामध्ये विविध खेळणी विकणे हा व्यवसाय सुरु केला आहे. तसे खेळणी विकणे हा त्यांचा पूर्वीपासूनचा व्यवसाय आहे. खेळणी विकणे हा व्यवसाय या समाजाच्या महिला करतात. या समाजाकडे काही प्रमाणात जमिनीसुध्दा आहेत. या समाजाचे लोकं जास्तकरुन शिक्षकाची नोकरी किंवा कंपनीमध्ये काम करतात. दुसऱ्याची मजुरी करत नाहीत. हे लोकं स्वतः चाच व्यवसाय जास्त प्रमाणात करतात. तरुण पिढीला ह्या पारंपरिक व्यवसायामधून फारशी मिळकत नसल्यामुळे त्याबद्दलचे आकर्षण वाटत नाही. त्यामुळे पिढ्यानपिढ्या चालत आलेले हे ज्ञानही कमी होत चालले आहे.

## वडार समाज

रस्त्याच्या कामासाठी दगडी फोडणे (खडी), मातीकाम, दगडी पाटा वरवंटा बनविणे, मिरची मसाला, सणा दिवशी पोळ्यासाठी पुरण वाटणे, तसेच तिखट करण्यासाठी उखळ, पाटा अशा विविध दगडी वस्तू बनविणे हा या समाजाचा पारंपरिक व्यवसाय. माती वाहण्यासाठी हा समाज गाढवही पाळीत असे. सध्याची परिस्थिती मात्र वेगळी आहे. नवीन यंत्रसामग्री आल्यामुळे गाढवाकडून मातीकाम करणे, माती वाहणे बंद झाले आहे. आता मिक्सर, चटणी करण्याचा डंक (मिरची कांडप मशिन) यामुळे दगडी पाटा, वरवंटा व उखळही कोणी वापरत नाही. त्यामुळे या वस्तू बनविणे बंद झाले आहे. तसेच गाढव पाळणे बंद झाले. चुकून एखाद्या माणसाकडे गाढव दिसते. यांत्रिकीकरणामुळे रस्त्यावरील खडी फोडणे, व सरकारी मातीकाम गाढवाकडून करुन घेणे बंद झाले आहे. त्यामुळे सध्या हा समाज खडी फोडणे हा व्यवसाय क्वचित खेडेगावात रस्त्यावर थोड्याफार प्रमाणात करताना दिसतो आहे. या समाजाने सुध्दा हॉटेल, पानसेंटर अशा प्रकारचा स्वतःचा व्यवसाय करायला सुरुवात केली आहे.

**आप्पा बाबर**
कार्यकर्ता, अंतरा संस्था, पुणे



# महिला ग्रामसभा

मागासलेल्या व दुर्बल जनतेचा सामाजिक व आर्थिक विकास घडवून आणण्याकरता सरकार विविध योजना आखत असते. त्या गावपातळीवर कार्यान्वित करण्याचे काम ग्रामपंचायत करत असते. त्याचबरोबर स्थानिक गावकऱ्यांना गावाच्या विकासासंबंधीचे निर्णय घेण्याकरता सहभागी होता यावे याकरता ग्रामसभांचे आयोजन केले जाते. यामध्ये गावातल्या शंभर टक्के लोकांनी सहभागी व्हावे ही योजना आहे.

आम्ही ज्या गटांबरोबर काम करतो ते बरेचसे मागासलेल्या व दुर्बल समाजातले वंचित गट आहेत. हे लोक प्राथमिक पातळीवर म्हणजे ग्रामसभेच्या पातळीवर लोकशाही पध्दतीने घ्यायचे निर्णय व कार्यवाही प्रक्रियेमध्ये सक्रीय भाग घेताना दिसत नाहीत. त्यामुळे त्यांना घटनेने व लोकशाहीने दिलेल्या त्यांच्या अधिकारांची माहितीच नसते. आमच्या प्रकल्पाचे एक अुद्दिष्ट म्हणजे मागासलेल्या व दुर्बल गटांच्या सक्रीय सहभागाच्या प्रक्रियेतून ग्रामसभेत जास्तीत जास्त अुपस्थिती असण्याची व निर्णयप्रक्रियेत महत्वाचा वाटा अुचलण्याची त्यांना जाणीव करून देणे हा आहे. यामध्ये ह्या गटांतल्या महिलांचाही सहभाग घडवून आणणे यावर आमच्या प्रकल्पाचा जास्त भर राहिल. आम्हाला असे वाटते की असे झाले तर स्थानिक गाव पातळीवर विकासाच्या प्रक्रियेची दिशा गावाच्या गरजेनुसार ठरविण्याचा अधिकार गावकऱ्यांना मिळू शकेल.

आम्ही वेळोवेळी गावागावात घेतलेल्या मिटींगमध्ये आम्हाला असे आढळून आले की मागासलेला व दुर्बल समाज ग्रामसभेत सहभागी न होण्याची काही प्रमुख कारणे याप्रमाणे आहेत:

- गावपातळीवर प्रत्यक्षात असलेले जातीजातीतले व समाजासमाजातले भेदभाव
- अुच्चवर्णीय व शक्तिशाली गटांचे वर्चस्व
- मिटींगमध्ये अुपस्थित रहायलाच पाहिजे या जाणिवेचा मागासलेल्या व दुर्बल गटांमध्ये असलेला अभाव
- ग्रामसभेमधले पुरूषांचे वर्चस्व ज्यामुळे महिला सहभागी होत नाहीत

(ह्या अडचणीवर मात करण्याकरता महाराष्ट्रात महिला ग्रामसभेचे आयोजन करण्याकरता एक विशेष तरतूद केली आहे. नेहेमीच्या ग्राम सभेच्या आधी एक दिवस संध्याकाळी, महिला ग्रामसभेची मिटींग व्हायला पाहिजे म्हणजे तिथे समस्यांची चर्चा करून दुसऱ्या दिवशी ग्रामसभेत आपले म्हणणे महिलांना मांडता येईल. परंतु असे काही अस्तित्वात आहे ह्याची माहितीही अनेक महिलांना नाही. आम्ही ज्या गावातून काम करतो तिथल्या महिलांना हे माहित नव्हते. ज्यामुळे महिला ग्रामसभेच्या प्रक्रियेत क्वचितच सहभागी होतात.)

- ग्रामसभेत सहभागी होण्याचा फारसा अुत्साह नसणे (ग्रामसभेकडे कंटाळवाण्या, शुष्क, काही थोड्यांचेच वर्चस्व असलेल्या मिटींग म्हणून पाहिले जाते.)

- ग्रामपंचायत पातळीवरचा भ्रष्टाचार
- ग्रामपंचायतीतल्या सभासदांकडून प्रत्यक्ष ग्रामसभेसंबंधात चुकीचे मार्गदर्शन

गावातल्या समाजांना ग्रामसभांमध्ये सहभागी होण्याचे महत्व व त्यांच्यामध्ये ग्रामसभेच्या प्रक्रियेत सहभागी होण्यात रस वाटावा व अुत्साह निर्माण व्हावा याकरता आम्ही वेगवेगळ्या गोष्टींचे प्रयोजन त्यांच्या सहभागाने केले,

१. ग्रामसभेचे वातावरण निर्माण करून व गावकरी आणि ग्रामपंचायतीचे सभासद यांच्याबरोबर प्रश्नोत्तरांचे चर्चासत्र घेअून, नाटकांची जशी तालीम करतात तशी ग्राम सभेची तालीम घेतली.
२. ग्रामसभा कशा घ्याव्यात व कशा घेअू शकल्या जातील यासंबंधीच्या फिल्म आम्ही गावकऱ्यांना दाखवल्या.
३. आमच्या लुटूपुटीच्या ग्रामसभेमध्ये भाग घेण्याकरता आम्ही ग्रामीण समाजातल्या जाणकार मंडळींना (Resource people) व शेजारच्या गावातील ग्राम सभांच्या सक्रीय सभासदांना आपापल्या अनुभवांची देवाणघेवाण करण्याकरता निमंत्रित केले.
४. ग्रामपंचायत व ग्रामसभा प्रक्रिया काय आहे हे समजण्याकरता आम्ही काही अभ्यास साहित्याचे वाटप केले. पंचायती राज व ग्रामसभा यांच्याबद्दलची काही मूलभूत व महत्वाची माहिती मराठीतून गावकऱ्यांना सांगितली.
५. आमच्याशी जोडलेल्या सर्व लोकांना ग्रामसभा भरण्याच्या एक दिवस अगोदर आम्ही एस एम एस, पाठवून आठवण करून दिली.

**आम्ही केलेल्या प्रयत्नांचा परिणाम व निष्पत्ती**

आम्ही जिथे जिथे ग्रामसभेच्या तालमी घेण्याचा प्रयोग केला त्या जवळजवळ सर्व गावातून ग्रामसभेला हजर राहणाऱ्या गावकऱ्यांच्या संख्येत वाढ झालेली दिसून आली.
याशिवाय, पाबळ गावातल्या दलित महिलांनी पूर्वीपेक्षा मोठ्या संख्येनी ग्रामसभेत अुपस्थिती नोंदवली आणि त्यांच्या गावात महिला ग्रामसभा भरावी याकरता अर्जही दिला. निरवांगी गावातील महिलांनीही त्यांच्या गावात महिला ग्रामसभा भरावी अशा आशयाचा अर्ज दिला.

केवळ महिला ग्रामसभांनीच सर्व प्रश्न मिटणार आहेत असे नाही. ह्या सभांमधून काही प्रश्न हाताळले जाअू शकतील. मागासलेल्या व दुर्बल घटकांच्या विकासासंदर्भातल्या समस्यांकरता हा एकच मंच योग्य असू शकणार नाही. काही समस्यांकरता कदाचित हे व्यासपीठ चुकीचेही असू शकेल. ह्याचे कारण, सर्वसाधारणपणे ह्या समस्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन व वर अुल्लेखल्याप्रमाणे ज्या तऱ्हेने कामकाज चालते त्यामुळे लोकांना वाईट प्रथांकडे झुकण्याचा मोह होअू शकतो. आमच्या असे लक्षात आले की ह्या समस्या सोडवण्याकरता गावकीसारखे इतरही काही पारंपरिक व्यासपीठ व मंच आहेत जिथे गावकरी स्वत:च्या निर्णय घेण्याच्या कौशल्याचा विकास करू शकतील, ज्यांचा माहिती मिळवण्याकरता व विचारांची देवाणघेवाण करण्याकरता अुपयोग करून पाहता येईल.

अंतरा संस्था, पुणे

☆☆☆


# ग्रामपंचायत व ग्रामसभा यासंबंधी काही उपयुक्त माहिती

(पंचायत राज मार्गदर्शिका, संपादक व संकलन : विजय वळजु व दत्ता गुरव,
रिसोर्स ॲन्ड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट, नवी मुंबई, ह्या पुस्तिकेवर आधारित)

## पंचायती राजची त्रिस्तरीय रचना

१९९२ साली अमलात आलेल्या ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीमध्ये विशेष म्हणजे पंचायती राजला अधिकार देऊन प्रशासकीय यंत्रणेचे अधिकार कमी केले आहेत, त्याचबरोबर ग्रामसभेव्दारे स्थानिक गावकऱ्यांना सत्तासहभागात महत्वाची भूमिका दिली आहे. अर्थात ग्रामपंचायतीचे अधिकार वापरण्यासाठी व ग्रामस्थांची महत्वपूर्ण भूमिका पार पाडण्यासाठी स्वत:च्या क्षमता वाढवणे ही या घटनादुरूस्ती व ग्रामपंचायतींची भूमिका ही केवळ लोकप्रतिनिधींनीच नव्हे तर सर्वांनीच समजावून घेणे आवश्यक आहे.

**पंचायती राजची त्रिस्तरीय व्यवस्था पुढीलप्रमाणे आहे :**




**ग्रामपंचायतीच्या निवडणूकीसाठी पात्रता:**

ग्रामपंचायतीच्या निवडणूकीसाठी २१ वर्षे पूर्ण केलेल्या कोणत्याही ग्रामस्थास उभे राहता येते आणि १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक ग्रामस्थास मतदानाचा अधिकार आहे. ग्रामपंचायत उमेदवारीकरीता वयाप्रमाणेच इतरही काही अटी आहेत. त्या पुढीलप्रमाणे,

- उमेदवार हा त्या ग्रामसभेचा सभासद असणे आवश्यक आहे, म्हणजेच त्या गावचा तो रहिवासी असला पाहिजे व तेथील मतदार यादीत त्याचे नाव असले पाहिजे.
- एक व्यक्ति एका वेळी एकाच वार्डातून निवडणूक लढवू शकते.
- उमेदवार व्यक्ति मानसिक दृष्ट्या आजारी असता कामा नये.
- ही व्यक्ति अस्पृश्यता, दारूबंदी, निवडणूक भ्रष्टाचार यापैकी कोणत्याही कायद्याखाली दोषी ठरवलेली वा अन्य गुन्ह्यांसाठी सजा झालेली नसावी.
- ही व्यक्ति पंचायतीच्या कामात किंवा सेवेत कराराने किंवा इतर भागीदारांमार्फत हितसंबंध असलेली नसावी, तसेच शासकीय कर्मचारी असणाऱ्या व्यक्तिला निवडणूक लढवता येत नाही.
- उमेदवाराने पंचायतीचे कर व अधिभार नियमीत भरलेले असावेत, त्याची कोणतीही थकबाकी असता कामा नये.

**ग्रामपंचायत गाव पातळीवरचे सरकार म्हणून काम पाहील, म्हणजेच:**

- गावाच्या व गावातील लोकांच्या समस्या काय आहेत हे जाणून घेईल.
- त्या समस्या सोडवण्यासाठी व विकास–कामांसाठी उपलब्ध साधने व राज्य शासनाचे सहाय्य याव्दारे योजना तयार करेल. तसेच,
- गावातील सर्व स्तरातील लोकांच्या

सहभागाने योजनांची कार्यवाही करेल.

ग्रामपंचायत तयार करण्यासाठी गावाची लोकसंख्या किमान एक हजार असणे आवश्यक आहे. यापेक्षा कमी लोकसंख्या असल्यास दोन तीन गावं / वाड्या यांची मिळून गटग्रामपंचायत सर्वात अधिक लोकसंख्या असलेल्या गावाच्या नावाने तयार केली जाते. नाव आणि ग्रामपंचायतीचे क्षेत्र निश्चित झाल्यावर गावाची / क्षेत्राची वॉर्डामध्ये विभागणी केली जाते. प्रत्येक वॉर्डात सारखे लोकसंख्येचे प्रमाण येईल अशा प्रकारे ही विभागणी होते. साधारणत: एक हजार लोकवस्तीस ७ वॉर्ड, २००० पर्यंत ९ वॉर्ड व याप्रमाणे ४००० पर्यंत १३ व त्यापुढे १५ वॉर्ड तयार केले जातात. जितके वॉर्ड तितके सदस्य असलेली ग्रामपंचायत गुप्त मतदान पध्दतीने तयार केली जाते.

निवडून आलेले सदस्य त्यांच्यातून एक व्यक्ति सरपंच व एक व्यक्ति उपसरपंच म्हणून निवडतात. सरपंच हा ग्रामसभेचा अध्यक्ष असतो. ग्रामसभा, ग्रामपंचायतीच्या बैठका ह्या सरपंचाच्या अध्यक्षतेखाली होतात. सरपंचाच्या अनुपस्थितीत उपसरपंचाने ही जबाबदारी पार पाडायची असते.

ग्रामपंचायतीची सर्व निवडणूक प्रक्रिया सांभाळण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्याची नेमणूक केली जाते.

## ग्रामसभा

ग्रामपंचायत निर्धारीत भूमिकेला अनुसरून काम करते की नाही हे पाहण्याची जबाबदारी ग्रामसभेची. ग्रामसभा म्हणजे गावाची सभा. नव्या पंचायती राज कायद्यामध्ये ग्रामसभेला विशेष महत्व आहे. गावाच्या मतदार यादीत नाव असलेली प्रत्येक व्यक्ति ग्रामसभेची सभासद असते.

ग्रामपंचायतीचे काम योग्य दिशेने चालले आहे की नाही ते पाहण्याचे काम नियमीत होण्याऱ्या ग्राम सभांचे आहे. कामातील तक्रारींकडे लक्ष वेधणे, पर्याय सुचवणे व गावाच्या हिताच्या दृष्टिने योग्य निर्णय घेण्यास ग्रामपंचायतीला प्रवृत्त करणे ही प्रामुख्याने ग्रामसभेची जबाबदारी आहे.

एका प्रकारे निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींचे काम कसे चालले आहे यावर नजर व नियंत्रण ठेवण्याचे ग्रामसभेचे काम आहे. त्यासाठी ग्रामसभा सदस्याला म्हणजेच गावातील प्रत्येक मतदाराला काही अधिकारही आहेत. नव्या घटनादुरूस्तीत याचा स्पष्ट उल्लेख आहे;

- ग्रामसभा आपल्या बैठकातून ग्रामपंचायतीच्या कामाचे परीक्षण करेल व पुढील नियोजनासाठी सूचना देईल
- ग्रामसभेच्या सूचनांची ग्रामपंचायतीने नोंद घेणे आवश्यक आहे.
- ग्रामपंचायतीची कोणतीही कागदपत्रे वा दस्तऐवज पाहण्याचे सदस्यास अधिकार आहेत.
- ग्रामपंचायतीचा कारभार लोकांसमोर व्हावा, निर्णय लोकांच्या मताने व्हावेत– ही ग्रामसभेच्या आयोजनामागील भूमिका आहे. जसे गावाचे निर्णय वरच्या सरकारने घेऊ नयेत तसेच गावाचे निर्णय मोजक्या दोन तीन जणांनी घेऊ नयेत व लोकांचा सहभाग घ्यावा. हे व्हावे यासाठी ग्रामसभेचे खूप महत्व आहे. म्हणूनच सर्वप्रथम ग्रामसभा नियमितपणे झाल्या पाहिजेत. तसेच त्यात लोकांनी माहितीपूर्ण

सहभाग घेणे, प्रश्न विचारणेही आवश्यक आहे. सद्यस्थितीत बहुसंख्य ठिकाणी ग्रामसभा केवळ उपचार म्हणून होतात, मोजकीच माणसे असतात, ज्यांची काही प्रकरणे असतात, तेवढीच माणसे जातात व आपल्यापुरतेच बोलून येतात. माझे काम झाल की संबंध संपला, ही मनोवृत्ती सोडून देऊन, जबाबदारीच्या भावनेनं ग्रामसभेत सहभाग आवश्यक आहे. लोक जागरूक असतील तर ग्रामसभा घ्यायला पंचायतीलाही भाग पडतं.

## ग्रामसभा कधी झाल्या पाहीजेत?

वर्षातून किमान चार ग्रामसभा होणे आवश्यक आहे. या बोलवण्याचा अधिकार ग्रामपंचायत व सरपंचाकडे आहे. या चार सभा ३१ मे व ३१ नोव्हेंबरच्या दरम्यान एक एक व १५ ऑगस्ट व २६ जानेवारीच्या निमित्ताने होणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त कितीही ग्रामसभा घेता येऊ शकतात.

ब्लॉक ऑफिस अथवा जिल्हा परिषदही विशेष कामासाठी ग्रामसभा बोलावू शकतात.

तसेच एक तृतीयांश ग्रामसभा सदस्यांच्या मागणीनुसारही ग्रामसभा बोलवावी लागते.

## ग्रामसभांचे विषय काय असले पाहिजेत?

- मे महिन्यातील ग्रामसभेत सरपंचाने मागील वर्षाचा हिशोब मांडला पाहिजे. मागील वर्षाच्या हिशोब तपासणीत दिलेल्या सूचना व त्यावर पंचायतीने दिलेले उत्तर ग्रामसभेसमोर मांडले पाहिजे. तसेच येणाऱ्या वर्षाचे नियोजनही मांडले पाहिजे आणि चालू वर्षी ग्रामनिधीतून हातात घेतल्या जाणाऱ्या कामांचे अंदाजपत्रक मांडले पाहिजे.
- नोव्हेंबरच्या सभेत पुढील वर्षाचे अंदाजपत्रक मांडले पाहिजे. कारण ते ३१ डिसेंबरपूर्वी पंचायत समितीला पाठवायचे असते.
- वर्षातील कोणत्याही ग्रामसभेत शासकीय अधिकाऱ्यांनी कळवलेले विषय ग्रामसभेपुढे मांडणे आवश्यक आहे.
- लोकांनी सुचवलेले विषयही ग्रामसभेत समाविष्ट करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीच्या कामाबाबत ग्रामसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देण्याची ग्रामपंचायतीची / सरपंचाची जबाबदारी आहे. जर समाधानकारक उत्तर मिळाले नाही तर मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा जिल्हा परिषद अध्यक्षांकडे तक्रार नोंदविता येते.
- ग्रामपंचायतीव्दारे शासनाच्या विशिष्ट जनसमूहांसाठी ज्या योजना राबवल्या जातात त्याची माहिती, लाभार्थींची निवड ग्रामसभेत झाल्यास गरजूपर्यंत त्या योजना पोहोचतील. ओळख पाहून, माणसांवर उपकार म्हणून पुढारी योजना राबवू शकणार नाहीत.

ग्रामसभेत सभासदांनी सहभागी व्हावे यासाठी त्यांना वेळ, दिवस, ठिकाण व विषयाची माहिती असणे आवश्यक आहे.

## ग्रामसभेचे नियम

- ग्रामसभेची नोटीस किमान सात दिवस आधी शाळा, ग्रामपंचायत कार्यालय इ. सर्व सार्वजनिक ठिकाणी लावणे आवश्यक आहे.
- विशेष ग्रामसभेसाठी किमान तीन दिवस आधी नोटीस दिली तरी चालते.

- या नोटीशीत ठिकाण, वेळ, विषय हे तपशील असणे आवश्यक आहे. विषयाच्या सूचना ग्रामसभा सदस्य ग्रामपंचायतीला कळवू शकतात.
- ग्रामसभेच्या आदल्या दिवशी दवंडी देऊन ग्रामसभेची माहिती दिली गेली पाहिजे.
- ग्रामसभेच्या आदल्या दिवशी विषयपत्रिका निश्चित करण्यासाठी ग्रामपंचायत सदस्यांची बैठक होणे आवश्यक आहे.
- मतदार यादीत समाविष्ट असलेल्या लोकसंख्येच्या १५ टक्के अथवा १०० ह्या दोन्हीपैकी जी संख्या कमी असेल ती संख्या गणपूर्तीसाठी आवश्यक मानण्यात येते. अशा कोरम अथवा गणपूर्तीअभावी सभा तहकूब करता येते व त्यानंतर पुन्हा झालेल्या सभेस गणपूर्तीची अट नाही. म्हणूनच ग्राम सभेची माहिती पुरेशी आधी व सर्व भागात मिळणे जरूरीचे आहे व संख्यापूर्तीसाठी नाही तर आपल्याला अपेक्षित विषयांवर चर्चा घडवून आणण्यासाठी व ग्रामसभेच्या जबाबदाऱ्यांचे पालन होण्यासाठी ग्रामस्थांनी स्वत:हून ग्रामसभात सहभागी होणे आवश्यक आहे.
- ग्रामसभा गावातील कोणत्याही मध्यवर्ती ठिकाणी घेता येऊ शकते.
- ती गावातील विविध वॉर्डात घेतली जावी व वर्षातील किमान एक ग्रामसभा दलित वस्तीत घेतली जावी असा संकेत आहे.
- लोकांना सोयीच्या अशा वेळी ग्रामसभा घेता येऊ शकते.

ग्रामसभांची माहिती घेणे, त्यात सहभागी होणे व त्या योग्य पध्दतीने पार पडतात की नाही हे पाहणे ही प्रत्येक ग्रामस्थाची जबाबदारी आहे.

# कोकणातली गावकी पध्दत

पूर्वी गावातले प्रश्न, ते खाजगी असोत, सामाजिक असोत, सांस्कृतिक असोत, आर्थिक असोत किंवा अन्य काही विषयावरचे असोत, ते गावकीत सोडवण्याची पारंपरिक प्रथा होती. गावकी म्हणजे एका वस्तीवर, एका गावात राहणाऱ्या लोकांनी एकत्र येऊन चर्चा करून, सर्वांना मान्य असतील असे निर्णय घ्यायचे. जेव्हा एखादी सामाजिक, विकासात्मक, सांस्कृतिक, वैयक्तिक, कौटुंबिक अडचण असेल तेव्हा गावकी बसते. गावकीची ही पारंपरिक प्रक्रिया अशाप्रकारे होते –

१. गावकी पध्दतीमध्ये गावकीचा मानकरी म्हणजे गावकीकरता निमंत्रण देणारा हा पारंपरिक प्रथेने निवडला जातो. गावातील एखाद्या सर्वमान्य आदरणीय व्यक्तिकडे हे पद असते व ते तसेच त्याच्या कुटुंबातल्या किंवा नातेवाईकातल्या योग्य व्यक्तिकडे चालू राहते. जर तशी एखादी लायक व्यक्ति कुटुंबात किंवा नातेवाईकात नसेल तर हे पद गावातल्या दुसऱ्या एखाद्या सर्वमान्य व आदरणीय व्यक्तिकडे सोपवले जाते.

२. गावचा मानकरी तीन प्रकारच्या पारंपरिक पध्दतीने गावकीचे निमंत्रण देतो – प्रत्येकाच्या घरी जाऊन, गावातील काही ठराविक ठिकाणी मोठ्या आवाजात ओरडून, गावातील मध्यवर्ती ठिकाणी ढोल वाजवून.

३. गावकी एका सार्वजनिक देवाच्या ठिकाणी घेतली जाते.

४. वैयक्तिक विषयाकरता गावकी असेल तर स्वत: त्या व्यक्तिने निमंत्रण द्यायचे असते.
५. गावकी संपवताना गावकर किंवा गावाचा मानकरी गावकी संपली असे जाहीर करतो. त्यानंतर सर्व ग्रामस्थ सभेतून अुठतात.

**गावकीत सर्वसाधारणपणे चर्चा होणारे विषय,**

समाजापुढे असलेल्या समस्या, गावच्या विकासाकरता एखादे काम करायचे असेल तर त्याकरता शासनाकडे मागणी करणे, एखादे विकासकाम सरकारकडून मंजूर झाले असेल तर ते पूर्ण करायच्या दृष्टीने निर्णय घेणे, एखाद्या अुत्सवाकरता सांस्कृतिक कार्यक्रमांची आखणी करणे, याशिवाय कौटुंबिक अडचणी, जमीन-जुमल्याचे प्रश्न, भांडण तंटा, वैयक्तिक अडचणी व इतर विषयही गावकीमध्ये चर्चिले जातात. ह्या सभेमध्ये सामोपचाराने काही निर्णय लागला नाही किंवा पटला नाही तर पुढची पायरी म्हणजे पोलीस स्टेशन किंवा कोर्ट. परंतु मिटींगमध्ये सर्वसाधारणपणे निर्णय पटतात.

**गावकीमध्ये निर्णय घेण्याची प्रक्रिया**

ह्या सभेला गावचा गावप्रमुख, वाडीप्रमुख, गावचे मानकरी व इतर सुशिक्षित बुध्दिवान ग्रामस्थ व इतर सर्व ग्रामस्थ अुपस्थित असतात. गावकीत महिलासुध्दा अुपस्थित असतात व त्यांना बोलण्याचा पूर्ण अधिकार असतो.

प्रथम गावकर गावकीची बैठक सुरु करायला परवानगी देतो. नंतर ज्या कोणाचे जे म्हणणे असेल ते किंवा जो विषय असेल तो मांडला जातो. एखाद्या मुद्यावरून भांडण असेल तर दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून त्यावर विचार केला जातो. सर्व अुपस्थित मंडळी चर्चा करून योग्य निर्णय घेतात व अडचणींवर मार्ग काढतात. वैयक्तिक विषय असेल तर निर्णय लागल्यावर दोन्ही बाजूंनी एकत्र येअून किंवा स्वत:च आपणहून समजून घेअून एक एक नारळ व शक्य असेल तर पैसे पाटावर ठेवून नमस्कार करतात. हे पैसै सामाजिक कार्यासाठी वापरले जातात.



गावाच्या विकाससंदर्भात काम असेल तर ग्राम सेवक, तलाठी, तहसीलदार, आमदार किंवा अन्य संबंधित व्यक्ति बोलावल्या जातात. काही अडचण असेल तर ग्रामस्थांच्या परवानगीने गावकीत तिच्याबद्दल विचार केला जातो. विकासाच्या कामात काही मदत, श्रमदान लागत असेल तर गावातर्फे तसे योगदान दिले जाते व काम पूर्ण करण्यासाठी मदत केली जाते. कामाची सुरूवात करताना व पूर्ण झाल्यावर अुद्घाटन करायच्या वेळी मानकऱ्यातर्फे सर्व ग्रामस्थांना निमंत्रण दिले जाते.

गावकी ही एका जातीची, एका ग्रुपची, एका वाडीची, एका गावाची किंवा दोन गावांमध्ये जर वाद असेल तर त्या दोन गावांचीसुध्दा गावकी बसते. गावकीमध्ये सर्व धर्म, जातीचे लोक अुपस्थित असतात. गावकराने घोषणा केल्यावरच गावकीची सभा समाप्त होते.

**राजन कुलये**
कार्यकर्ता, अंतरा संस्था

⋆⋆⋆

## घडामोडी

१. १ एप्रिल २०११ रोजी अंतरातर्फे ''रिड्क्शन ऑफ केमिकल्स इन मिल्क प्रोडक्शन'' या विषयावर कार्यशाळा संपन्न; नेदरलँडच्या कॅत्रिन व्हॅन हुफ यांच्यासह महाराष्ट्रातील प्रमुख दुध उत्पादक संस्थांचे संचालक, पशुवैद्यकिय अधिकारी व नाबार्डच्या संचालकांची उपस्थिती
२. ८ एप्रिल २०११ रोजी अंतरातर्फे ''रासायनिक किटकनाशकांचा मनुष्यावर परिणाम'' ह्या विषयावर चर्चासत्राचे आयोजन; सातारा, सोलापूर व पुणे येथील महिलांचा सहभाग
३. १९ व २० मे २०११ रोजी जे पी नाईक सेंटर येथे ग्रामविकासाच्या विविध मुद्यांवर व वनहक्कांवर चर्चासत्र संपन्न. पाच जिल्ह्यातुन शेतकरी व मेंढपाळांचा सहभाग
४. १ ते ७ मे २०११ दरम्यान नेपाळमधील बिरतामोड, खुदनाबारी व जरवाडोल या गावातील महिलांना संगिता खापरेकडून ''परसदारातील कोंबडीपालन'' ह्या विषयीचे प्रशिक्षण
५. ६ जून २०११ रोजी पुणे जिल्हा दुध उत्पादक संघातर्फे अवसरी दुध शीतकरण केंद्र येथे आयोजित दुध उत्पादक महिला मेळाव्यास अंतरातर्फे डॉ गायत्री व संगिता खापरे यांचा सहभाग

६. १ ते १७ जून २०११ दरम्यान आधारशिला शाळा, मध्यप्रदेश येथून आलेल्या अभिषेक व शिकारीया या आदिवासी समाजाच्या मुलांना रत्नागिरी येथे कोंबडीपालन व सेंद्रिय शेती या विषयांचे प्रशिक्षण. राजन, स्मिता व जगन यांचे मार्गदर्शन

७. १५ जून २०११ रोजी फ्रान्स येथील पशुवैद्यक शास्त्राच्या व्दितीय वर्षात शिकत असलेल्या फ्लोरा अल हकाक या विद्यार्थिनीचे अंतरा संस्थेत आगमन, दुधाळ जनावरातील दगडी / कासेचा रोग यावर संशोधन

८. जून २०११ मध्ये पुण्याजवळील पाबळ येथे विविध वनस्पती औषधे बनविण्याच्या प्रात्यक्षिकांचे आयोजन

९. विशेषत: महाराष्ट्रात होण्याऱ्या महिला ग्रामसभेची माहिती व पूर्वतयारी म्हणून जून व जूलै २०११ या महिन्यात पुण्यातील पाबळ व निरवांगी तसेच रत्नागिरीतील कळझोंडी येथे लुटूपुटीच्या महिला ग्राम सभांचे आयोजन, सर्व ठिकाणी महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद

१०. जुलै २०११ मध्ये रत्नागिरी येथील विविध गावात ''चारसुत्री पद्धतीने भातलागवड'' या विषयावर चर्चासत्रे व प्रात्यक्षिकांचे आयोजन

११. १ ऑगस्ट २०११ रोजी सातारा जिल्ह्यातील मेंढपाळांसाठी वनहक्क कायद्यासंदर्भात चर्चा; एनकॅसच्या लता मधुकर यांचे मोलाचे मार्गदर्शन

१२. जून व ऑगस्ट २०११ दरम्यान कोळवण, पाबळ व निटवेवाडी ह्या गावात जैविक कीडनियंत्रक बनविण्याचे प्रशिक्षण

१३. १२ ऑगस्ट २०११ रोजी पुणे जिल्हा दूध उत्पादक संघातर्फे आयोजित दुध उत्पादक शेतकरी मेळाव्यास अंतराच्या माहिती केंद्राचे आयोजन, शेतकऱ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद

१४. २५ ऑगस्ट २०११ रोजी केरळ कृषी विद्यापिठाच्या जेंडर स्टडी विभागातील संशोधक एलेक्स जिजू यांची अंतराच्या कार्यक्षेत्रातील महिलांसोबत चर्चा व अंतराच्या कार्यक्षेत्राला अभ्यासभेट

१५. १९ ते २५ सप्टेंबर २०११ दरम्यान हैदराबाद येथे ''पिअर लर्निंग इव्हेंट''चे आयोजन, अंतरासमवेत मिझेरीओर, यक्षी, गिरीजन दिपीका, ए. डि. एस. व ओरीसा येथिल संस्थांचा तसेच शेतकरी व मेंढपाळांचाही सहभाग

१६. ऑक्टोबर व नोव्हेंबर २०११ या महिन्यात पारनेर तालुक्यातील ढवळपुरी, वनकुंटे व गाझीपुर येथील मेंढपाळांसोबत वनहक्क व वनाधिकार कायदा यासंबंधी चर्चासत्रे.

१७. वाईझ (WISE) या संस्थेने पुणे येथे १८ व १९ ऑक्टोबरच्या दरम्यान आयोजित केलेल्या हवामान बदल व भविष्यकाळातला आर्थिक विकास (Climate change and Future of Economic Development and Governance) ह्या विषयावरच्या दोन दिवसाच्या कार्यशाळेत अंतराच्या डॉ गायत्री, डॉ सचिन व नम्रता यांचा सहभाग

१८. हवामान बदलामुळे महिलांवर होणारा

परिणाम ह्या विषयावर NCAS व YUVA यांनी १४ नोव्हेंबर २०११ रोजी नागपूरला आयोजित केलेल्या मिटींगमध्ये अंतराचे कार्यकर्ते राजन व स्मिता यांच्यातर्फे रत्नागिरीच्या महिला हवामान बदलाला कसे तोंड देत आहेत याबद्दलच्या एका निरीक्षणाचे सादरीकरण

१९. अंतरातर्फे १५ व १६ नोव्हेंबर २०११ रोजी, जे. पी नाईक सेंटर येथे पाच जिल्ह्यांतून आलेल्या शेतकऱ्यांच्या विविध भाजीपाला, तांदूळ यांच्या बियाण्यांचे प्रदर्शन

२०. एनकॅस, पुणे येथील महादेव रेगर या विद्यार्थ्याचे अंतरा संस्थेत नोव्हेंबर, डिसेंबर व जानेवारी या तीन महिन्यांकरता आगमन. वनहक्क व वनाधिकार कायदा, राष्ट्रीय रोजगार हमी योजना, ग्रामविकास यां संदर्भात मेंढपाळ व शेतकरी यांच्यासोबत माहितीची देवाणघेवाण

२१. १६ –१८ डिसेंबर २०११ ला कृपाविसतर्फे अलवर, राजस्थान येथे झालेल्या राष्ट्रीय पशुपालक मेळाव्यामध्ये सातारा, सोलापूर व पुणे येथील सहा मेंढपाळांचा सहभाग व ''वनहक्क आणि चारा समस्या'' या विषयांवर इतरांबरोबर देवाणघेवाण.

२२. अंतरा व गरीब डोंगरी संघटना, पुणे यांच्यातर्फे ऑक्टोबर, डिसेंबर २०११ व फेब्रुवारी २०१२ मध्ये तीन शेतकरी मेळाव्याचे आयोजन आणि शेती, शेतीतील अडचणी, सेंद्रिय शेती, शासनाच्या योजना इत्यादीबद्दल चर्चा.

☆☆☆



**बुक-पोस्ट**

प्रति,

**अंतरा**
एफ, लँटाना गार्डन्स, एन.डी.ए. रस्ता,
बावधन, पुणे ४११ ०२१, महाराष्ट्र
दूरध्वनी : (२०) २२९५३५४६, २२९५३५४७
ईमेल : anthra.pune@gmail.com
वेबसाईट : www.anthra.org